**आरबीआय/२०११-१२/३**
**महापरिपत्रक क्र.०३/२०११-१२** **जुलै ०१, २०११**

प्रति,

सर्व वर्ग-१ पाधिकृत डीलर बँक

महोदय / महोदया,

**विदेशी संस्थांद्वारे भारतात शाखा/संपर्क/प्रकल्प कार्यालये स्थापन करणे**

शाखा/संपर्क/प्रकल्प कार्यालये ह्यांची भारता मधील स्थापना वेळोवेळी सुधारित केलेल्या क्र. फेमा २२/२००० - आरबीआय दि. मे ३, २००० सह वाचित, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम ६(६) अन्वये नियंत्रित असेल.

२. ह्या महापरिपत्रकात, ‘विदेशी संस्थांद्वारे भारतात शाखा/संपर्क/प्रकल्प कार्यालये स्थापन करणे’ ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी एकत्रित करण्यात आल्या आहेत. ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या संबंधित परिपत्रकांची/अधिसूचनांची यादी जोडपत्रात दिली आहे.

३. हे महापरिपत्रक एक वर्षाच्या सन-सेट क्लॉजने देण्यात आले आहे, हे महापरिपत्रक जुलै १, २०१२ रोजी काढून घेतले जाईल व त्याच्या जागी त्या विषयावरील अद्यावत केलेले महापरिपत्रक दिए जाईल.

आपली,

**(मीना हेमचंद्र)**
**प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक**

## अनुक्रमणिका

(अ) सर्वसाधारण

(ब) विस्तार कार्यालय

(क) शाखा कार्यालय

(ड) अतिरिक्त कार्य/ अतिरिक्त शाखा/ विस्तार कार्यालयांसाठी आवेदन

(ई) शाखा/ विस्तार कार्यालयांद्वारे सादर केली जाणारी वार्षिक कामकाजाची प्रमाणपत्रे

(एफ) शाखा/ विस्तार कार्यालय बंद करणे

(ग) प्रकल्प कार्यालय

(एच) भारतामधील परकीय संस्थांच्या शाखा/ विस्तार कार्यालयांना लागू असलेल्या अन्य सामान्य अटी

जोडपत्र १

एफएनसी

जोडपत्र २

लेटर ऑफ कंफर्टचा मसुदा

जोडपत्र ३

परिशिष्ट

महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या अधिसूचना/परिपत्रकाची यादी

**‘परकीय संस्थांद्वारे भारतामध्ये शाखा/विस्तार/ प्रकल्प अधिकारी ह्यांची नियुक्ती करणे**

**(अ) सर्वसाधारण**

भारताच्या बाहेर स्थापना करण्यात आलेल्या कॉर्पोरेट सं्स्थेला (ज्यामध्ये व्यक्तींची फर्म किंवा अन्य संस्था समाविष्ट असेल) भारतामध्ये विस्तार कार्यालय (एलओ)/शाखा कार्यालय (बीओ) सुरू करायचे असेल, तर एफईएमए १९९९ अंतर्गत रिझर्व बँकेकडून अनुमती प्राप्त करावी लागेल. अशा संस्थांची फॉर्म एफएनसी (परिशिष्ट-१) अंतर्गतची आवेदने दोन प्रकारे रिझर्व बँकेद्वारे विचारात घेतल्या जाऊ शकतात.

- रिझर्व बँक रूट - ज्या वेळेस परकीय संस्थेचा मुख्य व्यवसाय अशा क्षेत्रामध्ये येत असेल, ज्या क्षेत्रात १०० टक्के विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (एफडीआय) ऑटॉमेटिक रूटनुसार मान्य केली गेलेली असेल;
- सरकारी रूट - ज्या वेळेस परकीय संस्थेचा मुख्य व्यवसाय अशा क्षेत्रामध्ये येत असेल, ज्या क्षेत्रात १०० टक्के विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (एफडीआय) ऑटॉमेटिक रूटनुसार मान्य केली गेलेली नसेल. ह्या गटात येणा-या संस्थांची आणि अन्य बिन सरकारी संस्था/ ना नफा तत्तवावर चालवल्या जाणा-या संस्था (नॉन प्रॉफिट ऑर्गनायझेशन्स)/ सरकारी यंत्रणा/ विभाग ह्यांची आवेदने भारत सरकारच्या आर्थिक मंत्रालयाबरोबरच्या चर्चेद्वारे रिझर्व बँकेद्वारे विचारात घेण्यात येतील.

परकीय संस्थांना विस्तार/शाखा कार्यालय ह्यांसाठी मान्यता देताना रिझर्व बँकेद्वारे पुढील अतिरिक्त निकषसुध्दा विचारात घेतले जातातः

- **आधीचे रेकॉर्ड (ट्रॅक रेकॉर्ड)**

  शाखा कार्यालयासाठी- गेल्या पाच सलग आर्थिक वर्षामधील मूळ देशामधील नफा मिळवतानाचे आधीचे रेकॉर्ड

  विस्तार कार्यालयासाठी- गेल्या तीन सलग आर्थिक वर्षामधील मूळ देशामधील नफा मिळवतानाचे आधीचे रेकॉर्ड

- निव्वळ पत [सर्वांत अद्ययावत लेखापरीक्षण केलेल्या ताळेबंद पत्रकानुसार किंवा प्रमाणित सार्वजनिक लेखापाल किंवा कोणत्याही नावाने नोंदणीकृत असलेल्या नोंदणीकृत लेखापाल व्यावसायिकाद्वारे प्रमाणित केल्याप्रमाणे देण्यात आलेले एकूण भांडवल आणि खुली राखीव रक्कम वजा अमूर्त साधाने]

  शाखा कार्यालयासाठी १००,००० अमेरिकन डॉलर किंवा त्याच्या सममूल्य रकमेपेक्षा कमी नाही

  विस्तार कार्यालयासाठी ५०,००० अमेरिकन डॉलर किंवा त्याच्या सममूल्य रकमेपेक्षा कमी नाही.

भारतामध्ये शाखा कार्यालय/ विस्तार कार्यालय सुरू करण्यासाठीचे आवेदन परकीय संस्थेद्वारे एका निहित एडी प्रवर्ग- १ बंकेद्वारे पुढील निहित कागदपत्रांसह मुख्य सामान्य प्रभारी व्यवस्थापक, भारतीय रिझर्व बँक, परकीय विनिमय विभाग विदेशी मुद्रा विभाग, विदेशी कर्ज विभाग, केंद्रीय कार्यालय, फोर्ट, मुंबई-४००००१ विभाग ह्यांना अग्रेषित केले गेले पाहिजे-

- स्थापनेच्या/ नोंदणीच्या प्रमाणपत्राची इंग्लिश आवृत्ती किंवा
  नोंदणी ज्या देशात केली गेली असेल त्या देशाच्या भारतीय दूतावासाद्वारे/ सरकारी नोटरीद्वारे सत्यापित केलेले नियम आणि नियमावली (मेमोरँडम व आर्टिकल्स ऑफ असोशिएशन)
- आवेदक संस्थेचे अद्ययावत लेखापरीक्षण केलेले ताळेबंद पत्रक

अर्हतेचे निकष पूर्ण न करणा-या आणि अन्य कंपन्यांचे घटक असलेल्या आवेदक संस्था जर त्यांची पालक संस्था वर दिलेले अर्हतेचे निकष पूर्ण करत असेल तर त्यांच्या पालक कंपनीकडून परिशिष्ट- २ अंतर्गत लेटर ऑफ कम्फर्ट सादर करू शकतात. एडी प्रवर्ग प्राप्त १ बँकेद्वारे आवेदकाच्या पार्श्वभूमीबद्दल, प्रमोटरच्या पूर्व चरित्राबद्दल, कार्याच्या स्वरूपाबद्दल आणि स्थानाबद्दल, निधीच्या स्त्रोतांबद्दल इत्यादि संदर्भात योग्य कार्यासक्ती (डिलिजन्स) ठेवला पाहिजे आणि त्यांच्या सूचना/ शिफारसी ह्यांसह आवेदन रिझर्व बँकेकडे अग्रेषित करण्याआधी केवायसी नियमांच्या पालनाची खात्री केली पाहिजे.

रिझर्व बँकेच्या मान्यतेसह स्थापन झालेल्या शाखा/ विस्तार कार्यालयांना एक विशिष्ट ओळख क्रमांक (युआयएन) आणि वेबसाईटही देण्यात येईल.

बीओज/एलओज ह्यांना भारतामध्ये कार्यालय सुरू केल्यानंतर आर्थिक कर यंत्रणेकडून एक स्थायी खाते क्रमांक (पॅन) सुध्दा प्राप्त करावा लागेल.

## (ब) विस्तार कार्यालय

### ब.१ विस्तार कार्यालयासाठी अनुमती असलेली कार्ये

विस्तार कार्यालय (जे प्रातिनिधिक कार्यालय म्हणूनही ओळखले जाते) फक्त विस्तार म्हणजे लिऑजिऑन कार्य करू शकेल; म्हणजेच ते विदेशातील मुख्य कार्यालय आणि भारतातील पक्ष ह्यांच्यामध्ये फक्त संपर्काचे माध्यम म्हणूनच कार्य करू शकेल. भारतामध्ये कोणतीही व्यावसायिक कृती करण्याची आणि भारतामध्ये उत्पन्न मिळवण्याची अनुमती त्यास नसेल. अशा कार्यालयांचा खर्च संपूर्णतः भारताबाहेर असलेल्या मुख्य कार्यालयातील परकीय विनिमयाच्या अंतर्गत वित्ताभरणा द्वारेच केला गेला पाहिजे. म्हणूनच अशा कार्यालयांची भुमिका फक्त संभाव्य मार्केट संधींबद्दल माहिती गोळा करणे आणि कंपनीची माहिती व तिच्या उत्पादनांची माहिती लक्ष्यित भारतीय ग्राहकांना देण्यापुरती मर्यादित आहे. अशी कार्यालये स्थापन करण्याची अनुमती सुरुवातीला तीन वर्षांच्या कालावधीसाठी दिली जाईल आणि ती एडी प्रवर्ग १ बँकेद्वारे वेळोवेळी वाढवली जाऊ शकेल.

विस्तार कार्यालय भारतामध्ये पुढील कार्ये करू शकेलः

i. मूळ पालक कंपनी/कंपनी ग्रूपचे भारतामध्ये प्रतिनिधित्व करणे.

ii. भारतामधील निर्यात/ आयात करण्यास चालना देणे.

iii मूळ पालक कंपनी/ कंपनी ग्रूप आणि भारतातील कंपन्या ह्यांच्यामध्ये तांत्रिक/ आर्थिक सहकार्यास चालना देणे.

iv. पालक कंपनी आणि भारतीय कंपन्या ह्यामधील संपर्कासाठी माधयम म्हणून कार्य करणे.

**ब.२. परकीय इन्शुरन्स कंपन्या/ बँका ह्यांचे विस्तार कार्यालय**

विमा नियामक आणि विकास प्राधिकारण (आयआरडीए) कडून मान्यता मिळाल्यानंतरच विदेशी विमा कंपन्या भारतामध्ये विस्तार कार्यालय स्थापन करू शकतात.

बँकिंग कार्य आणि विकास विभाग (डीबीओडी), भारतीय रिझर्व बँक, ह्यांच्याकडून मान्यता मिळाल्यानंतरच विदेशी बँका भारतामध्ये विस्तार कार्यालय स्थापन करू शकतात.

**ब.३ विस्तार कार्यालयांच्या मान्यतेच्या वैधतेमध्ये वाढ**

एडी कॅटगरी- १ दर्जा असलेली बँक जर तिच्याद्वारे पुढी अटींची पूर्तता होत असेल व आवेदन अन्य प्रकारे योग्य असेल, तर रिझर्व बँकेने मान्य केलेल्या/ वाढवून दिलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर तीन वर्षांसाठी एलओजची वैधाता वाढवू शकतातः

- गेल्या वर्षांमधील वार्षिक कार्याचे अहवाल एलओद्वारे सादर केलेले असले पाहिजेत आणि
- एडी कॅटगरी- १ दर्जा असलेल्या बँकेसह ठेवण्यात आलेले एलओचे खाते मान्यतेमध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तींनुसार चालवले जात असले पाहिजे.

रिझर्व बँकेच्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयामध्ये आणि मुख्य सामान्य प्रभारी व्यवस्थापक, परकीय विनिमय विभाग ह्यांच्याकडे युआयएन आणि मूळ मान्यता पत्राच्या संदर्भ क्रमांकासह विनंती सूचित केल्याची स्वीकृती मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत सत्वर असा अधिक कालावधी मान्य केला गेला पाहिजे.विदेशी मुद्रा विभाग, विदेशी कर्ज विभाग, केंद्रीय कार्यालय, फोर्ट, मुंबई-४००००१

बँक आणि विमा व्यवसायामध्ये कार्यरत असलेल्या संस्थांच्या एलओजच्या वैधाता कालावधीच्या मुदतवाढीचे आवेदन सरळ अनुक्रमे बँकिंग कार्य आणि विकास विभाग, भारतीय रिझर्व बँक आणि विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आयआरडीए), ह्यांच्याकडे त्यांनी निर्देशित केलेल्या पध्दतीने सादर केले पाहिजे. तसेच, एनबीएफसीज असलेल्या आणि बांधाकाम व विकसन क्षेत्रांमध्ये असलेल्या (इन्फ्रास्ट्रक्चर विकास कंपन्या वगळता) कंपन्यांच्या एलओजना मुदतवाढीसाठी विचारात घेतले जाणार नाही. वैधता कालावधी समाप्त झाल्यानंतर ह्या संस्थांना एक तर कार्य बंद

करावे लागेल, किंवा परकिय प्रत्यक्ष गुंतवणूक धोरणाच्या निर्देशानुसार संयुक्त उद्यम (जॉइंट व्हेंचर/ जेव्ही) किंवा संपूर्ण मालकी असलेली दुय्यम कंपनी (डब्ल्यूओएस) मध्ये रुपांतरित व्हावे लागेल.

## (क) शाखा कार्यालये

### क.१ अनुमती असलेली कार्ये

**अ).** भारताबाहेर स्थापन झालेल्या कंपन्या आणि व्यापार किंवा उत्पादनाच्या कार्यामध्ये सहभागी असलेल्या कंपन्यांना रिझर्व बँकेच्या विशिष्ट मान्यतेसह भारतामध्ये शाखा कार्यालये चालू करण्यास अनुमती देण्यात आली आहे. मूळ/ ग्रूप कंपनीचे प्रतिनिधित्व करण्याची अशा शाखा कार्यालयांना अनुमती देण्यात आली असून ते भारतामध्ये पुढील कार्ये करू शकतातः

i. सामानाची निर्यात/ आयात..[१]
ii. व्यावसायिक किंवा सल्लागार सेवा पुरवणे.
iii. मूळ कंपनी ज्या क्षेत्रात असेल, त्या क्षेत्रामध्ये संशोधान कार्य करणे.
iv. भारतीय कंपनी आणि विदेशातील मूळ/ ग्रूप कंपनी ह्यांमध्ये तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यास चालना देणे.
v. मूळ कंपनीचे भारतामध्ये प्रतिनिधित्व करणे आणि भारतामध्ये खरेदी/ विक्रीसाठी एजंट म्हणून काम करणे.
vi. माहिती तंत्रज्ञान सेवा आणि सॉफ्टवेयर सेवा ह्याबद्दल भारतामध्ये सेवा पुरवणे.
vii. पालक/ ग्रूप कंपनीद्वारे उत्पादित करण्यात येणा-या उत्पादनांना तांत्रिक सहकार्य करणे.
viii. परकीय एअरलाईन/ वाहतूक कंपनी.

सामान्यतः जी मूळ कंपनी ज्या कामात गुंतलेली असेल, ते काम शाखा कार्यालयाद्वारे केले जाणे अपेक्षित आहे.

**ब**) भारतामधील शाखा कार्यालयासाठी कोणत्याही प्रकारच्या ठोक व्यापारास अनुमती नाही.

**क**) प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रकारे भारतामध्ये कोणत्याही प्रकारचे उत्पादन किंवा प्रक्रिया करण्याचे कार्य करण्याची अनुमती शाखा कार्यालयास नाही.

**ड**) शाखा कार्यालयांद्वारे मिळवण्यात येणारे नफे भारतामधून लागू असलेले कर भरून मुक्तपणे पाठवता येऊ शकतील.

---

[१] निर्यातीसाठी सामग्रीची निर्मिती आणि आयातीनंतर सामानाची विक्री फक्त ठोक तत्तवावर लागू आहे

**क.२ विशेष आर्थिक क्षेत्रामधील (एसईझेड) शाखा कार्यालय**

(i) उत्पादन निर्मिती आणि सेवा देण्याच्या कामासाठी रिझर्व बँकेने परकीय कंपन्यांना विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये (एसईझेड) शाखा/ युनिट स्थापन करण्यासाठी सामान्य अनुमती दिलेली आहे. ही सामान्य अनुमती पुढील अटींसह आहे.

अ) ज्या क्षेत्रांमध्ये १००% परकीय थेट गुंतवणूक (एफडीआय) मान्य केलेली असेल, अशाच क्षेत्रांमध्ये हे युनिट्स कार्य करतील.

ब) असे युनिटस कंपनी अधिनियम, १९५६ (कलम ५९२ ते ६०२) च्या भाग अकराचे पालन करतील;

क) असे युनिटस स्टँड अलोन तत्वावर कार्य करतील.

(ii) बिझनेस समाप्त करण्याच्या परिस्थितीमध्ये आणि बंद करतानाच्या प्रक्रियेचा भरणा करण्यासाठी, शाखा एडी कॅटगरी- १ बँकेकडे जाईल व रिझर्व बँकेने दिलेल्या मान्यता पत्राशिवाय ''विस्ताराची समाप्ती/ शाखा कार्यालयाची समाप्ती'' ह्या खाली दिलेले सर्व दस्तावेज सादर करेल.

**क.३ परकीय बँकांच्या शाखा**

एफईएमए अंतर्गत भारतामध्ये शाखा कार्यालय सुरू करण्यासाठी परकीय बँकांना स्वतंत्र मान्यतेची आवश्यकता नाही. परंतु तरीही अशा बँकांना बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ मधील तरतुदींप्रमाणे बँकिंग कार्य आणि विकास विभाग, रिझर्व बँक ह्यांच्याकडून आवश्यक मान्यता प्राप्त करावी लागेल.

**(ड) अतिरिक्त कार्य/ अतिरिक्त शाखा/ विस्तार कार्यालयांसाठी आवेदन**

रिझर्व बँकेने सुरुवातीला अनुमती दिल्याखेरीज अन्य कार्याच्या अनुमतीसाठी मुख्य सामान्य प्रभारी व्यवस्थापक, परकीय विनिमय विभाग रिझर्व बँक ह्यांच्याकडे विशिष्ट एडी कॅटगरी-१ बँकेद्वारे विनंती अर्ज करता येईल व ते करताना प्रमाणित एडी कॅटगरी- १ बँकेच्या शिफारसीसह कारण नमूद करावे लागेल.

बीओ/एलओज स्थापित करण्याची विनंती एका नवीन एफएनसी प्रपत्राद्वारे (परिशिष्ट १) सादर केली जाऊ शकेल. त्या विनंती अर्जासह परकीय संस्थेच्या मूळ देशातील सक्षम अधिका-याची स्वाक्षरी रिझर्व बँकेने नमूद केलेल्या प्रकारे व वर दिलेल्या पध्दतीने असणे आवश्यक आहे. तरीही, जर आधी सादर केलेल्या दस्तावेजांमध्ये बदल नसतील, तर एफएनसी बनवण्यासाठीचे दस्तावेज पुनः सादर करण्याची गरज नाही.

- जर कार्यालयांची संख्या ४ पेक्षा अधिक असेल (उदा. प्रत्येक विभागात १ बीओ/एलओ, पूर्व पश्चिम उत्तर आणिदक्षिण) आवेधकाने कार्यालयाची आवश्यकता स्पष्ट करण्याची गरज आहे.
- आवेदक भारतातील त्याच्या एका कार्यालयास नोडल कार्यालय म्हणून मान्यता देऊ शकतो, जे त्याच्या भारतातील सर्व कार्यालयांमधील कार्याचे समन्वयन करेल.

**(ई) शाखा/ विस्तार कार्यालयांद्वारे सादर केली जाणारी वार्षिक कामकाजाची प्रमाणपत्रे**

त्या वर्षीच्या ३० सप्टेंबर रोजी किंवा त्या आधी रोजी लेखापरीक्षण केलेल्या ताळेबंद पत्रकासह ३१ मार्च अखेरीस वार्षिक कामकाज प्रमाणपत्रे (एएसी) (परिशिष्ट ३) ही प्रमाणपत्रे शाखा कार्यालये/विस्तार कार्यालये ह्यांना सादर करणे आवश्यक आहे. जर ३१ मार्च व्यतिरिक्त अन्य दिनांकासह एलओ/बीओ च्या वार्षिक खात्यांना मान्यता देण्यात आली असेल, तर लेखापरीक्षण केलेल्या ताळेबंद पत्रकासह एएसी ताळेबंदाच्या विहित तारखेपासून सहा महिन्यांच्या आत प्रमाणित एडी कॅटगरी १ बँकेला सादर केला जाऊ शकेल आणि त्याची एक प्रत सामान्य आयकर संचालनालय (आंतरराष्ट्रीय कर), नवी दिल्ली ह्यांना पाठवली जाऊ शकेल.

लागू असतील, त्या प्रमाणे पुढील प्रमाणपत्रे पुढील कार्यालयांद्वारे सादर केली गेली पाहिजेतः

(अ) जर एक बीओ/एलओ असेल, तर संबंधित बीओ/एलओ;
(ब) जर अनेक बीओ/एलओ असतील, तर भारतातील सर्व कार्यालयांसाठी एकत्रित वार्षिक कार्य प्रमाणपत्र बीओ/एलओजच्या नोडल कार्यालयाद्वारे;

प्रमाणित एडी कॅटगरी- १ बँक वार्षिक कार्य प्रमाणपत्राची पडताळणी करेल आणि खात्री करेल, की बीओ/एलओ द्वारे करण्यात आलेली कार्ये रिझर्व बँकेने मान्यतेसह दिलेल्या अटी व शर्तींना धारून आहेत. जर लेखापालास काहीही विपरित आढळले किंवा तसे प्रमाणित एडी कॅटगरी- १ बँकेच्या लक्षात आले, तर ते प्रमाणित एडी कॅटगरी- १ बँकेद्वारे तत्काळ त्या एलओजच्या संदर्भातील रिझर्व बँकेच्या क्षेत्रीय कार्यालयास आणि बीओजच्या संदर्भात रिझर्व बँकेच्या केंद्रीय कार्यालयास वार्षिक कार्य प्रमाणपत्र आणि त्यावरील टिप्पण्यांसह कळवणे आवश्यक आहे.

**फ ) शाखा/ विस्तार कार्यालय बंद करणे**

शाखा/ विस्तार कार्यालय बंद करताना कंपनीने प्रमाणित एडी कॅटगरी- १ बँकेला पुढील कागदपत्रे देऊन सादर झाले पाहिजेः

अ) बीओ/एलओ स्थापन करण्यासाठी क्षेत्रीय नियंत्रकाकडून रिझर्व बँकेच्या अनुमतीची/ मान्यतेची प्रत

ब) लेखापालाचे प्रमाणपत्र- i) ज्या प्रकारे देण्यात येणारी रक्कम आली असेल आणि आवेदकाच्या साधाने आणि दायित्वाच्या विधानाने समर्थित केली असेल, तो प्रकार दर्शवणे आणि साधाने सोडून देण्याची पध्दत दर्शवणे; ii) कार्यालयाचे ग्रेच्युअटी आणि कर्मचा-यांसाठीचे अन्य लाभ पूर्णपणे देण्यात आलेले आहेत किंवा पुरेशा प्रमाणात देण्यात आलेले आहेत आणि भारतातील जमा रकमेसह सर्व दायित्व पूर्ण करण्यात आल्याची निश्चिती; आणि iii) भारताबाहेरील कोणत्याही स्रोतांपासून कोणतेही उत्पन्न भारतामध्ये दाखल करणे शिल्लक नसल्याची (निर्यातींपासून मिळणा-या प्रोसीडसह) निश्चिती.

क)  भरणा करण्यासाठी आयकर प्राधिकरणाकडून ना- हरकत/ कर मुक्तता प्रमाणपत्र

ड) भारतातील कोणत्याही न्यायालयामध्ये कंपनीच्या विरोधात कोणतीही कायदेविषयक प्रक्रिया बाकी नसल्याचे आणि भरणा करणा-या पक्षासाठी कोणतीही कायदेविषयक बाब शिल्लक नसल्याची खात्री.

ई) भारतामध्ये कार्यालय समाप्त करता असल्यास कंपनी निबंधकाचा कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींच्या संदर्भातील अटींच्या पूर्ततेचा अहवाल.

फ) मान्यता देताना रिझर्व  बँकेद्वारे निधर्ाारित करण्यात आलेले अन्य कोणतेही कागदपत्र/ दस्तावेज.

प्रमाणित एडी कॅटगरी- १ बँकांना खात्री करावी लागेल, की बीओ/ एलओज ह्यांनी त्यांचे मागील वर्षांचे वर्तमान शाखा/ विस्तार कार्यालयाशी संबंधित वार्षिक कार्य प्रमाणपत्र रिझर्व  बँकेकडे सादर केले आहेत. त्याबद्दलचा दुजोरा बीओजच्या संदर्भात रिझर्व  बँकेच्या केंद्रिय कार्यालयाकडून आणि एलओजच्या संदर्भात संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडून मिळवता येतील.

अशा बीओ/एलओस समाप्त करताना त्याचा अहवाल प्रमाणित एडी कॅटगरी- १ बँकेद्वारे रिझर्व बँकेला (एलओजसाठी संबंधित प्रादेशिक कार्यालय आणि बीओजसाठी केंद्रिय कार्यालय) देणे आवश्यक आहे व त्यासह बीओ/एलओ द्वारे देण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करून त्यांची योग्यता प्रमाणित केल्याचे नमूद केले गेले पाहिजे. जर कागदपत्रे योग्य प्रकारे आढळली नसतील किंवा सुसंग नसतील किंवा केसेस एडी कॅटगरी बँकेच्या अखत्यारित येत नसतील, तर ती बँक आवेदन रिझर्व  बँकेला तिच्या निरीक्षणांसह आवश्यक कृतीसाठी अग्रेषित करू शकते. बीओ/एलओ कामकाजाशी संबंधित सर्व कागदपरे एडी कॅटगरी- १ बँकेद्वारे एडीच्या अंतर्गत लेखापालांद्वारे केल्या जाणा-या पडताळणीसाठी/ रिझर्व  बँकेच्या पर्यवेक्षक अधिका-यांद्वारे ठेवली जाऊ शकतात.

## (ग) प्रकल्प कार्यालय

### ग.१ सामान्य अनुमती

भारतामध्ये प्रकल्प चालवण्यासाठी त्यांनी भारतीय कंपनीसह करार केला असताना रिझर्व  बँकेने भारतामध्ये  प्रकल्प कार्यालये स्थापन करण्यासाठी परकीय कंपन्यांना पुढील अटींसह सामान्य अनुमती दिली आहे.

i. प्रकल्पास अंतर्गत विदेशी भरण्यासह प्रत्यक्ष स्वरूपात निधी प्राप्त आहे किंवा;
ii. द्विस्तरीय, बहुस्तरीय आंतरराष्ट्रीय निधी संस्थेद्वारे प्रकल्पास निधी मिळालेला आहे; किंवा
iii. कंत्राट करणा-या भारतातील कंपनीला किंवा संस्थेला ठराविक कालावधीचे कर्ज ह्या प्रकल्पासाठी भारतातील बँकेद्वारे किंवा सार्वजनिक वित्तासंस्थेद्वारे देण्यात आले आहे.
iv. परंतु, जर वरील अटींची पूर्तता झाली नसेल, तर परकीय संस्थेला भारतीय रिझर्व  बँक, केंद्रिय कार्यालय ह्यांच्याकडे मान्यतेसाठी यावे लागेल.

### ग.२ परकीय चलन खाते उघडणे

एडी कॅटगरी- १ बँका पुढील अटींसह भारतातील प्रकल्प कार्यालयांसाठी विना- व्याज परकीय चलन असलेली खाते उघडू शकतात.

i. . रिझर्व  बँकेच्या सामान्य/विशिष्ट अनुमतीसह भारतात प्रकल्प कार्यालय स्थापन केले गेले आहे व संबंधित प्रकल्प मान्यता प्राधिकरणाची आवश्यक मान्यता मिळाली आहे.

ii. ज्या कराराअंतर्गत प्रकल्पास मान्यता दिली गेली असेल, त्या करारात परकीय चलनातील रकमेची विशेष तरतूद असेल.

iii. प्रत्येक प्रकल्प कार्यालय दोन परकीय चलन खाती उघडू शकते; सामान्यतरू एकामध्ये अमेरिकन डॉलर चलन आणि दुस-यामध्ये  घरेलू चलन असते आणि ती दोन्ही खाती एकाच एडी कॅटगरी- १ बँकेद्वारे जतन केली जाणे आवश्यक आहे.

iv. खात्यामधील अनुमती देण्यास पात्र कर्ज प्रकल्पाशी संबंधित खर्च आणि कर्जाची रक्कम प्रकल्प मान्यता प्राधिकरणाच्या परकीय चलनी पावत्यांसह असेल आणि परकीय किंवा द्विस्तरीय/ बहुस्तरीय आंतरराष्ट्रीय आर्थिक कंपनी किंवा मूळ/ ग्रूप कंपनीकडून मिळणारी भरणा रक्कम असेल.

v. परकीय चलन खात्यामध्ये  फक्त प्रमाणित कर्ज आणि देय रकमा मान्य केल्या जातील ह्याची खात्री घेण्याची जवाबदारी संपूर्णपणे संबंधित एडीवर आहे. तसेच, ह्या खात्यांची संबंधित एडी बँकांच्या एकत्रित लेखापालाकडून १००% पडताळणी केली जाऊ शकेल.

vi. प्रकल्प पूर्ण होताना परकीय चलन खाती बंद केली गेली पाहिजेत.

**ग.३  भारतातील प्रकल्प कार्यालयांकडून होणारे खंडित भरणा (इंटरमिटंट रिमिटन्स)**

(i) पुढील अटींसह व्यवहाराच्या सद्भावनेबद्दल खात्री पटल्यास एडी कॅटगरी- १ बँक बाकी असलेल्या प्रकल्प प्रलंबित किंवा समाप्त होत असताना प्रकल्प कार्यालयांना खंडित भरणाची अनुमती देऊ शकते.

अ) आयकर इत्यादि भारतातील दायित्वांची पूर्तता पुरेशा प्रमाणात केली गेली असल्याचे लेखापालाचे/ चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणॅपत्र प्रकल्प कार्यालयाने सादर केले;

ब) भरणामुळे भारतातील प्रकल्पाच्या पूर्ततेला कोणत्याही प्रकारे बाधा पोचणार नाही आणि भारतातील कोणत्याही दायित्वासाठी निधीची कमतरता विदेशातील अंतर्गत भरण्यातून पूर्ण केला जाईल, अशा आशयाचे प्रकल्प कार्यालयाचे शपथपत्र.

निधीचे प्रकल्पांमध्ये हस्तांतरण करण्यासाठी रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यक्षेत्रात प्रकल्पाचे कार्यालय असेल, त्या कार्यालयाची अनुमती आधी मिळणे आवश्यक आहे.

**(ह) भारतामधील परकीय संस्थांच्या शाखा/ विस्तार कार्यालयांना लागू असलेल्या अन्य सामान्य अटी**

(i) रिझर्व बँकेच्या आधी घेतलेल्या अनुमतीशिवाय पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, अफगनिस्तान, इराण, भूतान किंवा चीनची नागरिक असलेली कोणतीही व्यक्ती भारतामध्ये  शाखा किंवा विस्तार कार्यालय किंवा प्रकल्प कार्यालय किंवा कोणतेही बिजनेस कार्यस्थान स्थापन करू शकत नाही

(ii) विदेशात स्थापन केलेले भागीदारी/ प्रोप्रायटरी संबंध ह्यांना भारतामध्ये  शाखा/ विस्तार/ प्रकल्प कार्यालय स्थापन करता येणार नाही.

(iii) नेपाळमधील संस्थांना भारतामध्ये फक्त विस्तार कार्यालये स्थापन करता येतील.

(iv) विस्तार कार्यालय वगळता परकीय संस्थेची शाखा/ प्रकल्प कार्यालयांना त्यांच्या स्वतःच्या वापरासाठी मालमत्ता मिळवण्याची आणि अनुमती असलेले/ आनुषंगिक कार्य करण्यासाठी वापरण्याची अनुमती आहे; परंतु ती मालमत्ता भाडयाने देण्याची किंवा वहिवाटीने देण्याची अनुमती नाही. तरीही, पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, अफगणिस्तान, इराण, भुतान किंवा चीन ह्यांच्या संस्थांना शाखा कार्यालयासाठीसुध्दा भारतामध्ये स्थावर मालमत्ता घेता येणार नाही. अशा संस्थांना अशी मालमत्ता पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी भाडयाने घेता येऊ शकेल.

(v) शाखा/ विस्तार/ प्रकल्प कार्यालयांना भारतामधील रूपये चलनानुसार विना- व्याज चालू खाती सुरू करण्याची अनुमती आहे. खाते उघडण्यासाठी अशा कार्यालयांना त्यांच्या अधिकृत वितरकाकडे जाणे आवश्यक आहे.

(vi) विस्तार/ शाखा कार्यालयाच्या साधानांचे अन्य उपशाखांमध्ये किंवा अन्य विस्तार/ शाखा कार्यालयांमध्ये हस्तांतरण करण्यास रिझर्व बँकेच्या केंद्रिय कार्यालयाच्या मान्यतेसह अनुमती दिली जाते.

(vii) लागू असलेले भारतीय कर भरून शाखेमध्ये राहिलेली निव्वळ रक्कम शाखा कार्यालये पुढील कागदपत्रे ज्यांच्याद्वारे भरणा केला जाईल, त्या अधिकृत वितरकाच्या समाधानासह भारताबाहेर देऊ शकतात.

अ.लेखापरीक्षण केलेले ताळेबंद पत्रक आणि संबंधित वर्षाचे नफा व तोटा खाते ह्याची प्रमाणित प्रत

ब. पुढील गोष्टी प्रमाणित करणारे चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र

i. भरणा करण्यात येणारा नफा काढण्याची पध्दत

ii. भरणा करण्यात येणारा सर्व नफा फक्त अनुमती असलेल्या कार्यांमधूनच मिळालेला असल्याबद्दल

iii. नफ्यामध्ये असा कोणताही नफा नाही, जो शाखेतील साधानांच्या मूल्यांकनानुसार मिळत असेल.

(viii) एखादी व्यक्ती भारताबाहेरील नागरिक असताना तिच्या शाखा/ कार्यालयासाठी ६ महिन्यांपेक्षा अधिक नसलेल्या कालावधीसाठी अधिकृत वितरक टर्म डिपॉजिट खाते उघडण्याची अनुमती देऊ शकतात व त्यासाठी टर्म डिपॉझिट तात्पुरत्या निव्वळ नफ्यातून मिळालेल्या निधीव्यतिरिक्त अन्य निधीशी संबंधित असल्याबद्दल आणि टर्म डिपॉझिटचय पूर्ततेच्या प्रोसेडस पूर्तता (मॅच्युअरिटी) झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत त्यांच्या भारतातील व्यवसायासाठी वापरले जातील, ह्याबद्दल बँकेची खात्री पटणे आवश्यक आहे.

**जोडपत्र १**

**एफएनसी**

**भारतामध्ये शाखा/संपर्क कार्यालय स्थापन करण्यासाठी अर्ज अ. अर्जदारांसाठी**

**सर्वसाधारण सूचना :**

हा अर्जाचा फॉर्म संपूर्णपणे भरून, घोषणापत्रावरील बाब (८) मध्ये निर्देशित केलेल्या कागदपत्रांसह, प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, रिझर्व बँक, विदेशी मुद्रा विभाग, विदेशी कर्ज विभाग, केंद्रीय कार्यालय, फोर्ट, मुंबई-४००००१ ह्यांचेकडे पाठविण्यासाठी, अर्जदाराने नेमलेल्या एडी वर्ग - १ बँकेकडे सादर करावा

| क्रमांक | **अधिक माहिती** | **विशिष्ट** |
|---|---|---|
| १) | अर्जदाराचे संपूर्ण नाव व पत्ता<br>अधिस्थापना/पंजीकरण<br>केल्याचे स्थळ व<br>तारीख<br>टेलिफोन<br>क्रमांक(एस)<br>फॅक्स क्रमांक(एस)<br>ई-मेल आयडी | |
| २) | भांडवलाबाबत माहिती<br>i) भरणा झालेला भांडवल<br>शेवटच्या ऑडिटेल<br>ii) ताळेबंदानुसार/वित्तीय विवरणपत्रानुसार/वित्तीय विवरणपत्रानुसार, मुक्त राखीव निधी/रिटेन्ड उत्पन्न<br>iii) अमूर्त मालमत्ता, (असल्यास) | |
| ३) | अर्जदाराच्या कार्यकृतींबाबत थोडक्यात वर्णन | |
| ४) | i) गेल्या वर्षातील प्रत्येक वर्षी अर्जदाराने भारतात केलेल्या/ भारताबाहेर निर्यात केलेल्या मालाचे मूल्यः<br>अ) भारतात केलेली आयात<br>ब) भारताबाहेर केलेली निर्यात<br>ii) ह्या कंपनीचे भारतात प्रतिनिधित्व करण्यास असलेल्या विद्यमान व्यवस्थांचा तपशील<br>iii).प्रायोजित संपर्क कार्यालय/शाखेचा कार्यालयः<br>अ) ह्या कार्यालयाद्वा<br>करावयाच्या/दिल्याजाणाऱ्या<br>कार्यकृती/सेवांचा<br>कार्यालय.<br>ब)कार्यालयाचे प्रायोजित स्थळ<br>क) फोन क्रमांक | |

| | | |
|---|---|---|
| | ड) ई-मेल आयडी<br>ई) कर्मचाऱ्यांची अपेक्षित संख्या (विदेशी लोकांसह) | |
| ५) | i) अर्जदाराच्या मूळ देशातील बँकरचे नाव व पत्ता<br>ii)टेलिफोन व फॅक्स क्रमांक<br>iii) ई-मेल आयडी | |
| ६) | ह्या अर्जाच्या पुष्टीसाठी अर्जदार देऊ इच्छित असलेली अन्य माहिती | |
| ७) | विना-नफा/बिनसरकारी संस्थांसाठीः<br>i) अर्जदार संस्थेने मूळ देशात व इतर देशांमध्ये केलेल्या कार्यकृतींची सविस्तार माहिती.<br>ii)भारतामधील कार्यकृतींसाठी लागणाऱ्या निधीचा स्तर<br>iii) त्या संस्थेचे पोट नियम, आर्टिकल्स ऑफ असोशिएशनच्या प्रती | |

**घोषणापत्र**

आम्ही येथे घोषित करतो कीः

i) वर दिलेली माहिती आमच्या विश्वासानुसार सत्य व खरी आहे.

ii) आमच्या भारतामधील कार्यकृती, वरील स्तंभ ४(iii) (अ) मध्ये निर्देशिल्यानुसारच सीमित असतील..

iii) ह्याच शहरात आम्ही आमचे कार्यालय हलविल्यास, आम्ही नेमलेल्या वर्ग - १ एडी बँकेला आणि रिझर्व बँकेला कळवू हे कार्यालय भारतामधील दुसऱ्या कोणत्याही शहरात हलविल्यास त्यासाठी रिझर्व बँकेची पूर्व मंजुरी घेतली जाईल.

iv) भारत सरकार/ रिझर्व बँक / नेमलेली एडी वर्ग-१ बँक ह्यांनी वेळोवेळी ठरविलेल्या अटी व शर्तींचे आम्ही पालन करु.

v) भारत सरकार /रिझर्व बँक ह्यांच्याद्वारे, विदेशातील आमच्या बँकर्सकडून अहवाल/मत मागविले जाण्यास आम्ही राजी आहोत असे आम्ही वचन देत आहोत.

vi) आम्हास जाणीव आहे की, आम्हाला मंजुरी दिली गेल्यास ती केवळ फेमाच्या दृष्टिकोनातूनच आहे आणि भारतातील कार्यकृती सुरु करण्यापूर्वी, इतर कोणतेही सरकारी प्राधिकरण/विभाग/मंत्रालय ह्यांचे किडून लागणाऱ्या अन्य मंजुऱ्या/नाहरकती, (वैधानिक किंवा अन्य) आमच्याकडून घेतल्या जातील

vii) मंजुरीबाबतची सविस्तर माहिती रिझर्व बँकेद्वारे सार्वजनिक केली जाण्यास आमची कोणतीही हरकत नाही.

viii) आम्ही पुढील कागदपत्रे सोबत जोडली आहेतः

१. पंजीकरणाच्या देशातील नोटरी पब्लिकने सत्यांकन केलेली, सर्टिफिकेट ऑफ इनकॉर्पोरेशन/पंजीकरणाच्या प्रमाणपत्राची प्रत
मूळ प्रमाणपत्र इंग्रजी सोडून अन्य भाषेत असल्यास, ते इंग्रजीमध्ये भाषीतरित केले जावे आणि वरीलप्रमाणे नोटराईज करुन घ्यावे आणि त्याचे भारतीय वकिलात/मूळ देशातील काँशुलेटकडून प्रतिसत्यांकित करुन घ्यावे.ट.

२. अर्जदार कंपनीचा अगदी अलिकडील ताळेबंद

झअर्जदाराच्या मूळ देशातील कायदे/विनियम लेखांचे ऑडिटिंग करण्याचा आग्रह धरत नसल्यास, सर्टिफाईड पब्लिक अकाउंट्स (सीपीए)ने दिलेले किंवा कोणत्याही नावाच्या रजिस्टर्ड अकाउंट प्रॅक्टिशनरने सत्यांकन केलेले व निव्वळ मूल्य स्पष्टपणे दिले असलेले लेखा विवरणपत्र सादर करावे.ट

३. अर्जदाराच्या मूळ देशातील/पंजीकरणाच्या देशातील बँकर्सचे. त्या बँकेची अर्जदात किती वर्षे व्यवहार करीत आहे हे दर्शविणारा त्या बँकर्सचा अहवाल.

(अर्जदार कंपनीच्या प्राधिकृत अधिकाऱ्याची सही)

**नावः**

**हुद्दाः**

**स्थळः**

**दिनांकः**

**जोडपत्र २**

**लेटर ऑफ कंफर्टचा मसुदा**

प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक,
रिझर्व बँक ऑफ इंडिया,
विदेशी चलन विभाग खाते,
विदेशी गुंतवणुकी विभाग
केंद्रीय कार्यालय, फोर्ट,
मुंबई- ४००००१.

महोदय,

**विषयः आमची दुय्यम कंपनी/कंपनी गट ह्यांच्याद्वारे शाखा/संपर्क कार्यालय स्थापन करण्यासाठी अर्ज.-------------------------------**

कृपया, आमची दुय्यम कंपनी/गटातील कंपनी-------------------------------ह्यांनी भारतात शाखा/संपर्क कार्यालय स्थापन करण्यासाठी आपल्या कार्यालयाकडे केलेल्या अर्जाचा संदर्भ घ्यावा.

२. ह्या संदर्भात, आम्ही ------------------------------ (मूळ कंपनी), आमच्या दुय्यम कंपनीला/ गटातील कंपनीला, भारतामध्ये शाखा /संपर्क कार्यालय स्थापन करण्यासाठी आवश्यक तो आर्थिक आधार देण्याचा स्वीकार करतो. भारतातील अशा शाखा/संपर्क कार्यालयाच्या कार्यकृतीमुळे निर्माण झालेली कोणतीही जबाबदारी, त्या शाखा/संपर्क कार्यालयाद्वारे पूर्ण न केली गेल्यास ती आम्ही (मूळ कंपनी) पूर्ण करु.

३. आम्ही ह्यासोबत आमच्या अगदी अलिकडिल ऑडिटेड ताळेबंदाच्या सर्टिफाईड पब्लिक अकाउंटंटने प्रमाणीत केलेल्या लेखा विवरणपत्राच्या स्वरुपात आमची आर्थिक पार्श्वभूमी जोडत आहोत.

.

आपला,

( ) सध्याच्या कंपनीच्या प्राधिकृत प्रतिनिधी

**जोडपत्र ३**

**वार्षिक कार्यकृती प्रमाणपत्र**

(मार्च ३१,.......रोजी असलुआनुसार एप्रिल ३०,......... रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावे).

**संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीस**

येथे प्रमाणित केले जात आहे  व दुजोरा दिला जात आहे की, सर्वश्री --------------- (युआयएन......) ह्यांच्या, पॅन नं ---------------------- असलेल्या शाखा/संपर्क कार्यालयाने ---------------------- पासून ते ---------------------- पर्यंत, रिझर्व बँकेने दिलेल्या तिचे मंजुरी पत्र क्र. -----------दि.------------- अनुसार असलेल्याच कार्यकृती केल्या असून वरील पत्रात निर्देशित केलेल्या अटी व शर्तींचे पालन केलेल आहे.

-----------------------------------------------

(ऑडिटर्सची सही)

(चार्टर्ड अकाउंटंटचे नाव)
आयसीएआय सभासदत्व क्रमांकः
पत्ता

स्थळः
दिनांकः

**परिशिष्ट**

**ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या अधिसूचना/परिपत्रकाची यादी**

http://www.rbi.org.in/scripts/Fema.aspx

| अनु. क्र. | अधिसूचना / परिपत्रक क्र. | दिनांक |
|---|---|---|
| १ | अधिसूचनाक्र. फ़ेमा २२/२०००र्ब | मे ०३, २००० |
| २ | अधिसूचनाक्र फ़ेमा १३/२०००र्ब | मे ०३, २००० |
| ३ | अधिसूचनाक्र फ़ेमा २१/२०००र्ब | मे ०३, २००० |
| ४ | अधिसूचनाक्र. फ़ेमा ९५/२००३र्ब | जुलै ०२, २००३ |
| ५ | अधिसूचनाक्र. फ़ेमा १०२/२००३-र्ब | ऑक्टोबर ०३, २००३ |
| ६ | अधिसूचनाक्र. फ़ेमा १३४/२००५र्ब | मे ०७, २००५ |
| ७ | अधिसूचनाक्र. फ़ेमा १६१/२००५र्ब | सप्टेंबर १८,२००७ |
| ८ | अधिसूचनाक्र. फ़ेमा १९८/२००९र्ब | सप्टेंबर . २४, २००९ |
| ९ | अधिसूचनाक्र. फ़ेमा २०४/२००९र्ब | एप्रिल ०५, २०१० |
| १० | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ३ | जुलै ०६,२००२ |
| ११ | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ३७ | नोव्हेंबर १५, २००३ |
| १२ | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ५८ | जानेवारी १६, २००४ |
| १३ | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ३९ | एप्रिल २५, २००५ |
| १४ | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ४४ | मे १७, २००५ |
| १५ | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ०२ | जुलै ३१, २००८ |
| १६ | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. २३ | डिसेंबर ३०, २००९ |
| १७ | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. २४ | डिसेंबर ३०, २००९ |
| १८ | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ०६ | ऑगस्ट०९, २०१० |

**सूचनाः उपयोग करणाऱ्या सर्वांच्या स्पष्टीकरणासाठी सांगण्यात येते की, हे महापरिपत्रक सर्वसमाशोधक असेलच असे नाही आणि पुढील माहिती/स्पष्टीकरण मिळविण्यासाठी, संबंधित ए.पी (डीआयआर सीरीज) परिपत्रकाचा संदर्भ घेणे आवश्यक आहे.**